# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०- २५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे-४११००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०-२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ-मेल: approval@unipune.ac.in

संदर्भ : सीए/3093

दिनांक : 03/08/2016

## परिपत्रक क्र.922/२०१६

विषय : पीएच.डी. संशोधन केंद्रांना/संस्थांना मान्यता देताना निश्चित करण्यात आलेल्या निकषाबाबत...

संदर्भ : १) वि.प. अ ४१/पीए/९०१२, दि. १८ डिसेंबर, २०१२.
२) भारतीय राजपत्र क्र. २७८, दि. ५ जुलै, २०१६.

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार आपणास कळविण्यात येते की, पीएच.डी. संशोधन केंद्रांना/संस्थांना मान्यता देताना खालीलप्रमाणे निकष आवश्यक आहेत.

१. संबंधित विषयाचे पूर्ण वेळ दोन संशोधन मार्गदर्शक त्या ठिकाणी कार्यरत असणे आवश्यक आहे.
२. संबंधित विषयाचे पदव्युत्तर अभ्यासक्रम आवश्यक आहे.
३. संशोधन केंद्रांना/संस्थांना कायम मान्यता देण्यात येणार नाही.
४. दर सहा महिन्याचा प्रोग्रेस रिपोर्ट विद्यापीठाकडे पाठविणे आवश्यक आहे.
५. कायमस्वरूपी प्राचार्य/संचालक आवश्यक आहे.
६. शिक्षकांच्या बदली प्रस्तावास मान्यता देताना संबंधित शिक्षकाने गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत काही रक्कम घेतली असल्यास, तसेच ते शिक्षक संशोधन मार्गदर्शक आहेत की नाही याची खात्री करूनच पुढील कार्यवाही करण्यात यावी.
७. भारतीय राजपत्र क्र. २७८, दि. ५ जुलै, २०१६ मधील नमूद केलेल्या सर्व तरतुदी ज्या संशोधन केंद्रास मान्यता देण्यात येणार आहे अशा सर्व संशोधन केंद्रासाठी लागू राहतील. एम.फिल./पीएच.डी. संशोधन केंद्र सुरू करण्यासाठी प्रस्ताव सादर करताना संबंधित विषयाचे २ पीएच.डी. संशोधन मार्गदर्शक तसेच सदर संशोधक मार्गदर्शक संबंधित महाविद्यालयामध्ये (Affiliated Colleges) /मान्यताप्राप्त संस्थेमध्ये (Recognised Institutes)/संशोधन संस्थेमध्ये(Recognised Research Institutes) कायमस्वरूपी पूर्णवेळ शिक्षक/संशोधक असणे आवश्यक आहे.

तरी सर्व मान्यताप्राप्त पीएच.डी. संशोधन केंद्र/सर्व मान्यताप्राप्त संस्था यांना विनंती की, सदर परिपत्रकाचा आशय लक्षात घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

कळावे,

संचालक
(म.वि.वि.मं.)